पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ८
**सभावृत्तांत**

दिनांक :- २५ / ०७ / २०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - २५ / ०७ / २०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. सौ. साळुंके सविता सुरेश
५) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
६) मा. आल्हाट मंदा उत्तम
७) मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
८) मा. काळे विमल रमेश
९) मा. बाबर शारदा प्रकाश

याशिवाय मा.भंडारे - प्र.उपनगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा. जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

विषय क्रमांक १ :- बचत गटांना अनुदान मिळणेबाबत - मा. आशा सुर्यवंशी , मा. वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव
विषय क्रमांक २ :- १ मुलीवर व २ मुलीवर शस्त्रक्रियाबाबत - मा. सविता साळुंके, मा. मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव
विषय क्रमांक ३ :- महिलांसाठी पेन्शन बाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा. मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव
विषय क्रमांक ४ :- मागासवर्गीय विविध कल्याणकारी योजनेबाबत - मा. किरण मोटे, मा. मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक - ११/०७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक - १
दिनांक - २५/०७/२०१२
सूचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा. वैशाली जवळकर
संदर्भ- मा.आशा सुर्यवंशी व मा. वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

नागरीवस्ती विकास योजने अंतर्गत शहरातील बचत गटांचे अनुदान दोन ते तीन वर्षे रखडलेले आहे. तरी त्या बचत गटांचे अनुदान अ.ब.क.श्रेणीमध्ये अनुक्रमे र.रु.१४०००/-, र.रु.१२०००/-, र.रु.१०,०००/- प्रमाणे लवकरात लवकर ठरवून ते महीला बचत गटांना देणेत यावे. शहरातील सर्वच बचत गटांना अनुदानाचा लाभ मिळणेकामी सदर धोरण निश्‍चितीकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - २
दिनांक - २५/०७/२०१२
सूचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा. मंदाकिनी ठाकरे
संदर्भ- मा.सविता साळुंके व मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव

१ मुलीवर व २ मुलीवर शस्त्रक्रिया केलेल्या महिलांना मिळणा-या अनुदानाच्या अटी शर्ती मध्ये महीलांची शस्त्रक्रिया केलेल्या दिनांकामध्ये १५ ऑगस्ट २०११ ही तारीख निश्‍चित केलेली होती त्या ऐवजी १ जानेवारी २००७ नंतरचे सर्व महीलांना वरील योजनेमध्ये अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ३
दिनांक - २५/०७/२०१२
सूचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा. मंदा आल्हाट
संदर्भ - मा. आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

महिला बालकल्याण योजने अंतर्गत विधवा व निराधार महीलांसाठी पेन्शन दरमहा र.रु.५००/- देण्यात यावी यासाठी शिथिल करावयाच्या अटी खालीलप्रमाणे-

१) मुलांच्या वयाची अट काढून टाकणे
२) उत्पन्नाची (र.रु. २१,०००/- ) अट काढून टाकणे

सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ४
दिनांक - २५/०७/२०१२
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ- मा.किरण मोटे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव-

मागासवर्गीय विविध कल्याणकारी योजनांची अर्ज स्वीकृती तारीख ९/८/२०१२ ऐवजी त्यास मुदतवाढ देऊन ती ९/९/२०१२ तारखेपर्यंत चालू ठेवावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

या नंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/१०३६/२०१२
दिनांक :- २६/०७/२०१२

प्र. उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.